# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रा.डॉ. गणेश भामे

एम्.ए., पीएच् डी.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/२०२६–२७/७२ दि. ०५/०६/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
फक्त पुणे जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : 'मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम**(SIR)-2026**' यशस्वीपणे राबविण्याकरिता राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांची नावे स्वयंसेवक म्हणून **Google Spread Sheet** मध्ये नाव नोंदणी करण्याबाबत...

संदर्भ : मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचा दिनांक:०३ जून २०२६ रोजीचा मेल

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रान्वये मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचेकडून महाराष्ट्रासह एकूण १९ राज्य आणि ०३ केंद्रशासित प्रदेशामध्ये मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण(SIR) कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे.

त्यानुसार सदर कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी(BLO) यांना सहाय्य करण्याकरिता राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून नियुक्त करण्यात येणार आहेत. त्यानुषंगाने जिल्हयामधील सर्व मतदार संघामध्ये करावयाच्या तयारीबाबत, विशेष सखोल पुनरिक्षण(SIR) कार्यक्रमाच्या माहितीबाबत तसेच मतदारांमध्ये करावयाच्या जनजागृती व व्यापक प्रसिध्दीबाबत माहिती देण्याकरिता व कार्यक्रम यशस्विरित्या राबविण्याकरिता नियोजन बैठकीचे आयोजन दि. ०१ जून २०२६ रोजी करण्यात आले होते.

सदर बैठकीमध्ये सर्वानुमते ठरल्यानुसार 'मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम(SIR)-2026' यशस्वीपणे राबविण्याकरिता राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांची नावे स्वयंसेवक म्हणुन नोंदणी करण्यासाठी निवडणूक शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेकडून पुणे जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघ, तालुकास्तरांवरील मतदान केंद्र क्रमांक, नाव व पत्ता याची मतदान केंद्रस्तरीय अधिकारी(BLO) सह असलेली माहिती Google Spread Sheet मध्ये दिली आहे. सदर Google Spread Sheet लिंकमध्ये आपल्या महाविद्यालयातील रासेयो विद्यार्थ्यांची त्यांच्या परिसरातील त्यांच्या इच्छेनुसार त्यांना अपेक्षित ठिकाणी स्वयंसेवक म्हणून नावनोंदणी तात्काळ करण्यात यावी.

तसेच याबाबतची माहिती BOD लॉगीनमध्ये NSS - Gov Other Reports - Add New - योजना/उपक्रम निवडा यामध्ये उपक्रमाचे नाव **"मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम(SIR)-2026"** या विषयाची निवड करून सादर करण्यात यावा. **अहवाल सादर करताना 'संक्षिप्त अहवाल/अभिप्राय/टिपणी/प्रतिक्रीया' याठिकाणी सदर उपक्रमाकरिता सहभागी विद्यार्थ्यांची माहिती घ्यावी.** आपल्या माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबत मा. जिल्हाधिकारी कार्यालयाचा मेल जोडला आहे. कळावे, ही विनंती.

**Google Spread Sheet लिंक :**
https://docs.google.com/spreadsheets/d/13L5Wjcb8KuCVgVHwOeq4wBEquy8P80h4sLJbBsBjNRM/edit?usp=sharing

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : मा. जिल्हाधिकारी कार्यालय यांचा मेल

Subject :- मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (SIR)-२०२६-विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्याकरिता राष्ट्रीय सेवा योजना मधील विद्यार्थ्यांची नावे **Google Spread Sheet** मध्ये स्वयंसेवक म्हणून नोंदविणेबाबत.

From Dydeopune Pune <dydeopune1@gmail.com>

To <principalspcpune@gmail.com>, <info@spcollegepune.ac.in>, <jedhe_c@rediffmail.com>, <amagar@vsnl.net>, <principalssmmpune9@gmail.com>, <principal@spcollegepune.ac.in>, <yclawpune@gmail.com>, <principal@vit.edu>, <principal@apcoer.edu.in>, <principal@pvgcoet.ac.in> 434 more...

Date 2026-06-03 19:16

---

बैठकीमध्ये सर्वानुमते ठरल्यानुसार, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व राष्ट्रीय छात्र सेना (NCC) च्या विद्यार्थ्यांची स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्यासाठी निवडणूक शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे यांचेकडून पुणे जिल्हातील विधानसभा मतदारसंघ, तालुकास्तरांवरील मतदान केंद्र क्रमांक, नाव व पत्ता याची BLO सह असलेली माहिती Google Spreed Sheet लिंकद्वारे सर्व NSS व NCC समन्वयक यांना share करण्यात येत आहे. खालील link मधील Google Spread Sheet मध्ये आपल्याकडील नोंद असलेले NCC व NSS च्या विद्यार्थ्यांची नोंदणी संबंधित विद्यार्थ्यांचा रहिवास असलेल्या भागातील त्यांचे इच्छेनुसार त्यांना अपेक्षित ठिकाणी करण्यात यावी.

https://docs.google.com/spreadsheets/d/13L5Wjcb8KuCVgVHwOeq4wBEquy8P80h4sLJbBsBjNRM/edit?usp=sharing